N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** हातकणंगले

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0568 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/10/2024 23:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/10/2024
**Time From (वेळेपासून):** 16:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/10/2024 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 064

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/10/2024 23:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हातकणंगले पोलीस ठाणे, हातकणंगले ,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पडताळणी पंचनामा दिनांक १६/१०/२०२४

पडताळणी पंचनामा दिनांक १६/१०/२०२४



6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुभाष बाबासो शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, युआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुंभोज,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुंभोज,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9730069321

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविकांत भैरू शिंदे | | वडील का नाम : भैरू शिंदे | 1. समीर मोरे यांचे घरी भाड्याने पाच तिकटी,हातकणंगले ,हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 32 भारतीय | 16,000.00 |

पडताळणी पंचनामा दिनांक १६/१०/२०२४
पडताळणी पंचनामा दिनांक १६/१०/२०२४



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुभाष बाबासो शिंदे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुंभोज,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुंभोज,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9730069321

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविकांत भैरू शिंदे | | वडील का नाम : भैरू शिंदे | 1. समीर मोरे यांचे घरी भाडयाने पाच तिकटी,हातकणंगले, हातकणंगले,हातकणंगले , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 32 भारतीय | 16,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(रू. मध्ये)):**

16,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 18/10/2024

मी सुभाष बाबासो शिंदे, वय - 42 वर्षे, व्यवसाय- व्यापारी, रा.कुंभोज, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मो.नं. 9730069321 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 16/10/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मी एकत्रित कुटूंबियांसह वरील पत्यावर राहणेस आहे. माझे कुंभोज, ता. हातकणंगले गावी शिंदे ट्रेडर्स नावाचे किरणा मालाचे दुकान आहे. सुमारे एक महिनापुर्वी हातकणंगले पोलीस ठाणेकडील कुंभोज बिटातील पोलीस हवालदार शिंदे साहेब हे माझे किरणा मालाचे दुकानात येवुन मला तुमचे दुकानातुन गुटखा पान मसाला विक्री केला जातो तुझ्यावर कारवाई करणार असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना गुटखा विक्री करत नाही असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला तुला जर गुटखा विक्री करायची असेल तर प्रति महिना 10,000/- रूपये दयावे लागतील अन्यथा कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे सागुन निघुन गेले होते. त्यानंतर दिनांक 15/10/2024 रोजी सायंकाळी 05.00 वा चे सुमारास शिंदे साहेब यांनी त्यांचा मो.क्र.9421251635 वरून मला माझे मो.क्र. 9730069321 वरती फोन करून मला भेटायला बोलविले त्यावेळी मी त्यांना हातकणंगले येथे जावुन भेटलो. त्यावेळी पुन्हा शिंदे साहेब यांनी मला तुमचे दुकानातुन गुटखा पान मसाला विक्री केला जातो तुझ्यावर कारवाई करणार, कारवाई नको असेल तर महिना 10,000/- दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यानी तडजोड करून माझेकडे प्रत्येक महिन्याचे 4,000/- रूपये तसेच मी कुंभोज बिटमध्ये येवुन चार महिने झाले असुन चार महिन्याचे मिळुन एकुण 16,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगून तेथून निघून आलो होतो. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 16/10/2024 रोजी दुपारनंतर शिंदे साहेब यांना हातकणंगले पोलीस ठाणे येथे भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी साळुंके साहेबांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेब यांनी मला हातकणंगले येथील रामलिंग जाणारे रोडवर महालक्ष्मी मंदिराचे पाठीमागील रिकामे जागेत जावुन थांबणेस सांगुन ते पाठीमागुन येत असल्याचे सांगितले. मी व साळुंके साहेब फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. साळुंके साहेब यांनी रामलिंग जाणारे रोडवर आल्याचे सांगुन त्यांनी मला ते थांबलेले ठिकाणी बोलाविले त्यानंतर मी तेथे जावुन साळुंके साहेब यांना भेटलो. त्यावेळी तेथे साळुंके साहेबांनी मला शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्याच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन हातकणंगले पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार शिंदे यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 यादव यांना माझेकडील मोटर सायकल हिरो कंपणीची एच.एफ.डीलक्स एम.एच - 09 - डी डब्ल्यु.-7362 वरून हातकणंगले पोलीस ठाणे येथे पाठवुन दिले. त्यावेळी मी हातकणंगले येथील तुळशी हॉटेल समोरून शिंदे साहेब यांना माझे वरील मोबाईल क्रमांकवरून त्यांचा मो.क्र. 9730069321 वरती फोन केला त्यावेळी मी त्यांना सुभाष बोलतोय म्हटल पिंटू

हॉटेल मध्ये आलोय म्हटलं हॉटेल मध्ये आलोय असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब यांनी पोलीस ठाणेस गर्दी आहे असे म्हणाले. त्यावेळी मी थाबतो थोडावेळ असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब मला यायला वेळ मिळणार नाही असे म्हणाले त्योवळी मी त्यांना अर्धातास थांबतो हॉटेलात असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब यांनी पैसे रियाजकडे दया असे म्हणाले त्यावेळी मी त्याच्याकडे कशाला तुमच्याकडे घ्या समोरासमोर बोलायचं होतं म्हणून म्हटलं असे म्हणुन मग उद्या येतो काय त्याला उद्या येऊ का मग असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब यांनी संध्याकाळी या फोन करतो असे म्हणाले त्यावेळी मी बर मग कुठे येऊ संध्याकाळी ठीक आहे फोन करा मग हं असे म्हणालो त्यानंतर आम्ही तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. पोलीस शिंदे साहेब यांनी सध्याकाळी फोन करून बोलवितो असे सांगितल्याने शिंदे साहेब यांचे फोनची वाट पाहत आम्ही सर्वजण थांबुन राहीलो. संध्याकाळी बराचवेळी शिंदे साहेबांच फोन आला नाही तसेच मी जर फोन केला तर त्यांना संशय येईल म्हणुन चालु कारवाई तात्पुरती स्थगीती करून साळुंके साहेबानी पुढील कारवाई दि.17/10/2024 रोजी करणेचे सांगितले.

दिनांक 17/10/2024 रोजी सकाळी 10.35 वाजता साळुंके साहेब, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ असे काल थाबलेल्या ठिकाणी आले होते तेथे मी त्यांची भेट घेतली. त्यावेळी साळुंके साहेबांनी शिंदे साहेबांना फोन करणेस सांगितला त्याप्रमाणे मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरून शिंदे साहेब यांचे मो.क्र.9730069321 वरती फोन केला त्यावेळी मी तेच की रात्री फोन करतो म्हटला केला नाही...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब जे केलातो की तुम्ही बाहेर गेलता वाटल... असे म्हणाले. त्यावेळी मी बर मग बोलायचं होतं कुठं येवू मग...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब यांनी मी आता जयसिंगपुरला आलोय दादा...असे म्हणाले त्यावेळी शिंदे साहेब यांनी जयसिंगपूरला मिटींगला आलो असुन यायला दोन तीन तास लागतील झाले की कॉल करतो असे म्हणुन फोन बंद केला. पोलीस शिंदे साहेब यांनी फोन करून बोलवितो असे सांगितल्याने शिंदे साहेब यांचे फोनची वाट पाहत आम्ही सर्वजण थांबुन राहीलो. त्यानंतर काहीवेळाने मी त्यांना फोन केला असता त्यांचा फोन बिझी लागत होता. त्यानंतर काहीवेळाने मला माझे वरील मोबाईल क्रमांकावर मो.क्र. 7741001635 वरून फोन आला सदरचा फोन शिंदे साहेब याचा असलेने मी कट करून पुन्हा त्यांचे मो.क्र. 7741001635 वरती फोन लावला असता त्यांनी ते पोलीस ठाणेस आल्याचे सांगितले.

त्यानंतर साळुंके साहेब यांनी मला व पंच नं.1 यादव यांना पोलीस हवालदार शिंदे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करणेकरीता आवश्यक सुचना देवुन पोलीस हवालदार शिंदे यांची भेट घेणेकरीता मला व पंच नं. 1 यादव यांना पाठविले. मी हातकणंगले पोलीस ठाणे समोरून त्यांना फोन करून पोलीस ठाणे बाहेर आल्याचे सांगितले त्यावेळी त्यांनी मला पोलीस ठाणेत आत येण्यास सांगितले. मी व पंच पोलीस ठाणेत आत गेलो त्यावेळी आमचेत रियाज फोन उचलत नाही या अनुषंगाने बोलने झाले त्यानंतर मी शिंदे साहेबांना माझी एक अडचण हाय एक महिन्याचा काही कमी जास्त करा... असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब कशाबददल... असे म्हणाले. त्यावेळी मी माझ काय कुठं बंदच हाय ओ...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब राहू दे कायच देवू नका ना...असे म्हणाले. त्यावेळी मी तस नव्ह...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब तुमच्याकडं धंद्यावाल्याच्यावर काय दया येणार नाही दादा काल काय झालतं तुम्ही मला...असे म्हणाले त्यावेळी मी तुम्हाला सांगू कारण सांगतो काय म्हणालाय ये बी म्हटला दे बी म्हणाला व कारवाई करणार बर ठिक हाय जे काय असेल ते करूया मगाशी फोन उचलला नाही इचलकरंजी ला गेलतो माल आणायलाय...असे म्हणालो. त्यानंतर आमचेत शेतीचे कामाबाबत बोलने झाले. त्यानंतर मी मग ह्यात काय कमी होणार नाही म्हणा...असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब देतो आणतो म्हणून गेलाय...असे म्हणाले त्यावेळी मी झालं तेचा काय विषय सोडा...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब कमी विषय नाही कधी...असे म्हणाले. त्यावेळी मी शिंदे साहेबांना एक महिन्याचे कमी करा याबाबत बोलणे झाले त्यावेळी मी हे कमी जास्त झालं समोरसमोर झालं वर पडलय कमी जास्त झालं तेवढं हं फोन वरून बोलून कमी होतं...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब जास्तीत जास्त का देईनासा झालायसा की आम्ही कारवाई केली नाही...असे म्हणाले. त्यावेळी मी तीन हजार कमी करा की...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब कस म्हणून काय म्हणून होत नाही माहिती हाय तुमची तुम्हा लोकांची.... असे म्हणाले. त्यावेळी मी नाय तर काय हाय ओ तुम्ही म्हणन तेच आम्ही कराच...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब बसा तो पर्यंत तिथं तुम्ही तुमच्या परीनं राहवा मी आमच्या परीनं राहतो...असे म्हणाले. त्यावेळी मी नको काय नको...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब आता चार महिने झालेत...असे म्हणाले त्यावेळी मी घराकडं जावून पैसे घेवून येतो...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब आता आणि परत जाणार...असे म्हणाले.त्यावेळी मी येतो लगेच असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच त्यानंतर आम्ही तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. माझेत व शिंदे साहेब यांचेत लाचेच्या अनुषंगाने बोलने झाले परंतु त्यांनी नेमके किती रूपये घेवुन यायचे याबाबत बोलने झाले नसल्याने पुन्हा शिंदे साहेब यांना फोन करून त्याबाबत निश्चीती

करणेसाठी माझे वरील मोबाईल क्रमांक वरून शिंदे साहेब यांचे मो.क्र. 7741001635 वरती फोन केला त्यावेळी मी अ शिंदे साहेब सुभाष बोलतोय...असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब बोला की.. असे म्हणाले. त्यावेळी मी हा ते पैसे जरा कमी हाईत तुम्ही सांगितलेलं सोळा हजार रूपये मग थोडी जुळना करतो पैशाची आणि थोडा वेळ लागल मला यायला वेळ लागल ह...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब राहू दे राहु दे राहू दे असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर पुन्हा शिंदे साहेब यांना फोन केला असता त्यांचा फोन बिझी येत होता. शिंदे साहेब यांना पुन्हा फोन केला त्यावेळी मी हा यायला लागलोय म्हटलं...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब राहु दे राहु दे राहु दे...असे म्हणाले त्यावेळी मी नाय जुळना झालीया...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब नाय राहू दे राहू दे ऐका...असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर शिंदे साहेबांना पुन्हा पुन्हा फोन केला तर त्याना संशय येईल म्हणुन चालु कारवाई साळुंके साहेबांनी तात्पुरती स्थगीती केली. मी घरी असताना मला गावातील रियाज यांचेकडुन निरोप आला की, मला शिंदे साहेबांनी दिनांक 18/10/2024 रोजी सकाळी पोलीस ठाणेस बोलविले आहे. त्याप्रमाणे मी लागलीच साळुंके साहेबांना कळविले त्यावेळी साळुंके साहेबांनी मला ते दिनांक 18/10/2024 रोजी सकाळी 10.30 वा चे सुमारास पुर्वी थांबलेल्या ठिकाणी येत असल्याचे सांगुन मला तेथे येण्यास सांगितले.

आज दिनांक 18/10/2024 रोजी सकाळी 11.10 वा साळुंके साहेब, पंच व त्यांचा स्टाफ असे काल थाबलेल्या ठिकाणी आले होते तेथे मी त्यांची भेट घेतली. त्यावेळी साळुंके साहेब यांनी मला व पंच नं.1 यादव यांना पोलीस हवालदार शिंदे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करणेकरीता आणखीन आवश्यक सुचना देवुन पोलीस हवालदार शिंदे यांची भेट घेणेकरीता मला व पंच नं. 1 यादव यांना पाठविले. मी हातकणंगले पोलीस ठाणे येथे आलो त्यावेळी मला तेथे आमचे गावातील रियाज भेटला मी शिंदे साहेब यांना त्यांचे मो.क्र. मो.क्र. 7741001635 वरती फोन केला असता त्यांनी मला पोलीस ठाणेत आत येण्यास सांगितले. त्यावेळी मी व रियाज तसेच पंच असे पोलीस ठाणेत आलो त्यावेळी मी शिंदे साहेब यांना भेटलो त्यावेळी मी काल मी तुम्हाला बोललो मागण येतो करून देतो त्याबददल सॉरी असे म्हणालो त्यावेळी शिंदे साहेब मनात शंका येते ना बरोबर की नाय...असे म्हणाले. त्यावेळी माझेबरोबर आले पंचाकडे बघुन शिंदेसाहेबांनी त्यांना तुम्हाला कोण पाहीजे असे विचारले त्यावेळी पंच नं.1 यांनी पाकीट हरवल आहे त्यासाठी विचारयला आलो आहे असे सांगितले. त्यावेळी त्यांचेत पाकीट हरवल्याची तक्रार कोठे दयायची याबाबत बोलने झाले. त्यावेळी माझेत व शिंदे साहेब यांचेत पोलीस ठाणेस गर्दी आहे, कोर्टाचे तसेच कामाचे टेन्शन ने साखर वाढली आहे असे बोलने चालु होते. त्यावेळी मी काय थोड कमी करा तुम्ही सोळा हजार सांगितल्यात...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब सोळा हजार सांगितल्यात हो त्यात किती सांगितल्यात होत्यात किती चारी चौक...असे म्हणाले. त्यावेळी मी बर ठिक हाय सोळा हजारावर ठराव झाला पण या महिन्याचं आता...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब संपलं की हयो महिना...असे म्हणाले. त्यावेळी आमचेत हप्ता कसा व कोणत्या महिन्याचा दयायचा याबाबत बोलने झाले. त्यावेळी शिंदे साहेब यांनी जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर एक नोव्हेबर पासून नविन महिना असे म्हणाले. त्यावेळी मी हा हा असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब कसला काय लोढ आणि क्लिअर कट त्या दिवशी बोलय आपण...असे म्हणाले. त्यावेळी मी ठिक हाय आता विषय संपला पैशाचा विषय संपला घ्या सोळा हजार सांगितलाय संपला...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब देवूनटाका की मग झामशान चला...असे म्हणाले त्यावेळी मी देणार की साहेब काय नाही म्हटलोय...असे म्हणालो. त्यावेळी मी त्यांना पैसे घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन घडलेली हकीकत त्यांना सांगितली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. त्यावेळी पोलीस हवानदार शिंदे साहेब हे माझे किरणा मालाचे दुकानात गुटखा विक्री केली जाते त्यावर कारवाई न करणेसाठी माझेकडे प्रत्येक महिन्याचे 4,000/- रूपये असे चार महिन्याचे मिळुन एकुण 16,000/- रूपये लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर साळूंके साहेबांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 16,000/- रूपये माझे पॅन्टचे पुढील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर साळुंके साहेबांनी रेकॉर्डर सुरु करून माझेकडे दिले व त्यांचे सुचनेवरून मी व पंच नं.01 यादव माझे मोटरसायकलने निघालो. माझे पाठोपाठ साळुंके साहेब, सापळा पथक, पंच नं.2 पाटील आले व हातकणंगले पोलीस ठाणेचे परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच पोलीस ठाणेत जावुन शिंदे साहेब यांना जावुन भेटलो त्यावेळी मी मोजून घ्या सोळा हजार दिलेत काय त्यामुळे माझे गिराईकाला त्रास करायचा नाही आताच सांगतो ठराव करून दया मला...असे म्हणालो. त्यावेळी शिंदे साहेब काय काय असे म्हणुन मी दिलेले 16,000/-रूपये त्यांनी हातात घेवुन हाताने पैसे मोजुन ते त्यांचे पॅन्टचे पुढील डावे बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर आमचेत माझे धदयाचे अनुषंगाने बोलने चालु असताना मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता साळुंके साहेब त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह शिंदे साहेब यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक

तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही पोलीस स्टेशन मधील एक कक्ष उपलब्ध करून तेथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी माझे कुंभोज गावतील शिंदे ट्रेडर्स नावाचे किरणा मालाचे दुकानात हातकणंगले पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार शिंदे साहेब यांनी येवुन मला तुझे दुकानात गुटखा पान मसाला विक्री केला जातो तुझ्यावर कारवाई करणार, कारवाई नको असेल तर महिना 10,000/- दयावे लागतील असे त्यांनी माझेकडे तडजोड करून प्रत्येक महिन्याचे 4,000/- रूपये तसेच ते कुंभोज बिटमध्ये येवुन चार महिने झाले असुन चार महिन्याचे मिळुन एकुण 16,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे अप्रामाणिकपणे 16,000/-रू ची मागणी करून त्यांनी माझेकडुन बेकायदेशीरपणे 16,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी रविकांत भैरू शिंदे, वय - 50 वर्षे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.नं.1635, नेमणुक हातकणंगले पोलीस ठाणे जि.कोल्हापूर रा. समीर मोरे यांचे घरी भाडयाने पाच तिकटी,हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मुळ रा.फणसवाडी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sharad Shankrrao Memane (I (Inspector)) / POBN84064

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): or (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन)

**Name (नाव):** Sharad Shankrrao M
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN84064